**सीएनआर नं.एमएचएसआय –०७–०००२१६–२०१२**

**<u>दिवाणी किरकोळ अर्ज क. २६/२०१२ मधील नि.क्र. ३१ वरील आदेश</u>**

अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. उभयपक्षकारांतर्फे संपूर्ण युक्तिवाद ऐकला. अर्जदाराने तिच्या साक्षीदाराविरुध्द दि. १७/११/२०१७ रोजी पुराव्याचे शपथपत्र खोडून टाकण्याचा झालेला आदेश रद्दबातल होवून मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जातील नमूद कारणांचा विचार होवून सदरील आदेश रद्दबातल होवून मिळण्याची तिने मागणी केलेली आहे.

०२. सामनेवालातर्फे प्रस्तुत अर्जावर थोडक्यात असे म्हणणे आहे की, अर्जातील कारण खोटे असून त्याचे पुष्ठयर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही. सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा. इत्यादी सर्व बाबी नमूद करुन सामनेवाल्याने अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०३. अभिलेख व रोजनामा यांचे अवलोकन केले. त्यावरुन असे दिसून येते की, दि. १७/११/२०१७ रोजी नि.क्र. २५ वर अर्जदारतर्फे साक्षीदार क्र. २ नरहरी विश्वनाथ परब याच्या पुराव्याचे शपथपत्र खोडून टाकण्याचा आदेश निर्गमित करण्यात आला आणि सदरील आदेश रद्दबातल होवून मिळणेसाठी अर्जदाराने दि. २९/०१/२०१८ रोजी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. असे दिसून येत आहे की, नि.क्र. २५ वरील दि. १७/११/२०१७ रोजीचा आदेश रद्दबातल होवून मिळण्यासाठी अर्जदाराने कोणतेही संयुक्तिक कारण नमूद केलेले नाही. तथापि, मुळ अर्जातील अर्जदाराची मागणी लक्षात घेता; न्यायाच्या दृष्टिकोनातून नि.क्र. २५ वरील वर नमूद आदेश रद्दबातल करणे उचित राहील. तसेच अर्जदाराने साक्षीदारास उलटतपासाकामी हजर ठेवण्यास केलेला विलंब पाहता; तिच्यावर रक्कम रु. २००/– इतका खर्च आकारुन व खर्चाची रक्कम सामनेवाल्यास देवू करुन नि. क्र. २५ वरील आदेश रद्दबातल करणे उचित राहील. करीता खालीलप्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करण्यात येतो.

**आदेश**

१. अर्ज अर्जदारावर रक्कम रु. २००/– (रक्कम रु. दोनशे मात्र) इतका खर्च

आकारुन मंजूर करण्यात येतो.

२. नि.क्र. २५ वरील दि. १७/११/२०१७ रोजीचा अर्जदारतर्फे साक्षीदार क्र. २ नरहरी विश्वनाथ परब याच्या पुराव्याचे शपथपत्र खोडून टाकण्याचा झालेला आदेश रद्दबातल करण्यात येतो.

३. खर्चाची रक्कम अर्जदाराने सामनेवाल्यास पुढील तारखेस अथवा तत्पुर्वी द्यावी. तसे न झाल्यास प्रस्तुतचा आदेश रद्दबातल करण्यात येईल.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित केला.)

सही/—

दिनांक :—१२ जुलै, २०१८ (आर.आर.काळे)
ठिकाण :—मालवण. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर मालवण.